RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक १६(२)] मंगळवार, जुलै ९, २०१९/आषाढ १८, शके १९४१ [पृष्ठे १३, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक २९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका



| | |
|---|---|
| **सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.—** वस्तू व सेवा कर विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणा-या विभिन्न अधिनियमांखालील देय असलेला जो कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क अनुक्रमे आकारण्यात, देय किंवा लादण्यात आले होते असा कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम .. .. .. | पृष्ठे १-१३ |



दिनांक ८ जुलै २०१९ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक ९ जुलै २०१९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**वस्तू व सेवा कर विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणा-या विभिन्न अधिनियमांखाली देय असलेला जो कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क अनुक्रमे आकारण्यात, देय किंवा लादण्यात आले होते असा कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६, मुंबई मोटार स्पिरीट विक्री कराधान अधिनियम, १९५८, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९, महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, १९७५, महाराष्ट्र कोणताही माल कोणत्याही प्रयोजनार्थ वापरण्याच्या हक्काच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५, महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रामध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, १९८७, महाराष्ट्र ऐषाराम कर अधिनियम, १९८७, महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनरधिनियमित) अधिनियम, १९८९, महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२ आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याखाली देय असलेला जो कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क अनुक्रमे आकारण्यात, देय किंवा लादण्यात आले होते असा कर, व्याज, शास्ती किंवा, यथास्थिति, विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक ६ मार्च २०१९ रोजी, महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अध्यादेश, २०१९, हा प्रख्यापित केला होता ;

१९५६ चा ७४. १९५८ चा मुंबई ६६. १९५९ चा मुंबई ५१. १९६२ चा महा. ९. १९७५ चा महा. १६. १९८५ चा महा. १८. १९८७ चा महा. ४२. १९८७ चा महा. ४१. १९८९ चा महा. ३६. २००३ चा महा. ४. २००५ चा महा. ९. २०१९ चा महा. अध्या. ५.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे विवक्षित बदलांसह राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०१९, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ६ मार्च २०१९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

**२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " जोडपत्र " याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेले जोडपत्र, असा आहे;

(ख) " अपील प्राधिकारी " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले प्राधिकारी, असा आहे;

(ग) " कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांची थकबाकी " याचा अर्थ, विनिर्दिष्ट कालावधीशी संबंधित असलेला कर, व्याज, शास्ती किंवा, यथास्थिति, विलंब शुल्क यांची रक्कम आणि,—

(एक) संबद्ध अधिनियमाखालील वैधानिक आदेशानुसार करपात्र व्यक्तीकडून देय असलेला; किंवा

(दोन) संबद्ध अधिनियमाखालील, विवरणानुसार किंवा सुधारित विवरणानुसार देय असलेला परंतु पूर्णतः अथवा अंशतः न भरलेला ; किंवा

(तीन) मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ६१ नुसार सादर केलेल्या लेखापरीक्षा अहवालात, लेखापरीक्षकाने निर्धारित व देय असल्याचे शिफारस केलेला, आणि मग त्याबाबतीत कलम ३२ किंवा ३२क अन्वये नोटीस दिलेली असो अथवा नसो; किंवा

(चार) संबद्ध अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीनुसार ज्याबाबत नोटीस दिलेली असेल असा ; किंवा

(पाच) संबद्ध अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीनुसार ज्याबाबत नोटीस दिलेली नसेल परंतु, करपात्र व्यक्तीकडून देय असल्याचे निर्धारित केलेला,

कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांची थकबाकी, असा आहे ;

(घ) " अर्जदार " याचा अर्थ, संबद्ध अधिनियमान्वये आकारलेला किंवा लादलेला कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांबद्दलची थकबाकी भरण्यास जबाबदार असलेली या अधिनियमाखालील शर्तींचे पालन करून त्याद्वारे तडजोडीचा लाभ घेण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(ङ) " आयुक्त " याचा अर्थ, वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (क) अन्वये राज्यकर आयुक्त म्हणून नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे आणि त्यामध्ये, मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम १० च्या पोट-कलम (१) अन्वये विक्रीकर आयुक्त म्हणून नियुक्त केलेल्या अधिका-याचा समावेश आहे ;

(च) " पदनिर्देशित प्राधिकारी " याचा अर्थ, कलम ३ अन्वये नियुक्त केलेला प्राधिकारी, असा आहे ;

(छ) " विवादित कर " याचा अर्थ, खंड (थ) मध्ये व्याख्या केलेल्या अविवादित कराव्यतिरिक्त इतर कर, असा आहे ;

२०१७ चा महा. ४३. (ज) " वस्तू व सेवा कर अधिनियम " याचा अर्थ महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७, असा आहे ;

(झ) " शासन " किंवा " राज्य शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ञ) " तडजोडीचा आदेश " याचा अर्थ, कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीच्या तडजोडीबद्दलचा या अधिनियमान्वये काढलेला आदेश, असा आहे ;

(ट) " संबद्ध अधिनियम " याचा अर्थ १ जुलै २०१७ पूर्वी कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांची थकबाकी रक्कम याबाबत लागू असलेले पुढील अधिनियम, म्हणजे :—

१९५६ चा ७४. (एक) केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ ;

१९५८ चा मुंबई ६६. (दोन) मुंबई मोटार स्पिरीट विक्री कराधान अधिनियम, १९५८ ;

१९५९ चा मुंबई ५१. (तीन) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ ;

१९६२ चा महा. ९. (चार) महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ ;

१९७५ चा महा. १६. (पाच) महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, १९७५ ;

१९८५ चा महा. १८. (सहा) महाराष्ट्र कोणताही माल कोणत्याही प्रयोजनार्थ वापरण्याच्या हक्काच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५ ;

१९८७ चा महा. ४२. (सात) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रामध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, १९८७ ;

१९८७ चा महा. ४१. (आठ) महाराष्ट्र ऐषाराम कर अधिनियम, १९८७ ;

१९८९ चा महा. ३६. (नऊ) महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनरधिनियमित) अधिनियम, १९८९ ;

२००३ चा महा. ४. (दहा) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२, आणि

२००५ चा महा. ९. (अकरा) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२,

असा आहे, आणि त्यामध्ये, त्याखाली केलेले नियम किंवा जारी केलेल्या अधिसूचना यांचा देखील समावेश आहे;

(ठ) " आवश्यक रक्कम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये पहिल्या टप्प्याच्या किंवा, यथास्थिति, दुस-या टप्प्याच्या कालावधीत भरणे आवश्यक असलेली रक्कम, असा आहे आणि ती रक्कम, अधिनियमाच्या कलम १० अन्वये निश्चित केलेली आणि या अधिनियमास जोडलेले जोडपत्र-क किंवा जोडपत्र-ख मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, या अधिनियमाखालील उक्त टप्प्यांच्या कालावधींमध्ये भरलेल्या पुढील रकमांची बेरीज असेल,—

(एक) अविवादित कराची रक्कम, आणि

(दोन) विवादित कर, व्याज, शास्ती, विलंब शुल्क, निर्धारणोत्तर शास्ती किंवा निर्धारणोत्तर व्याज—मग ते आकारलेले असो किंवा नसो यांची रक्कम ;

(ड) " विवरणानुसार असलेली देणी " याचा अर्थ, विनिर्दिष्ट कालावधीसंबंधीची, विवरणानुसार किंवा सुधारित विवरणानुसार असलेली, परंतु, १६ ऑगस्ट २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी कोणत्याही वेळी पूर्णतः किंवा अंशतः थकित राहिलेला कर, व्याज किंवा विलंब शुल्क यांची रक्कम, असा आहे ;

(ढ) " विनिर्दिष्ट कालावधी " याचा अर्थ, दिनांक ३० जून २०१७ रोजी किंवा त्यापूर्वी संपणारा कोणताही कालावधी, असा आहे ;

(ण) " वैधानिक आदेश " याचा अर्थ, अर्जदाराकडून देय असलेला कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांची मागणी करण्यासाठी संबद्ध अधिनियमान्वये काढलेला कोणताही आदेश, असा आहे;

(त) " प्रवेशावरील कर अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२, असा आहे; २००३ चा महा. ४.

(थ) " अविवादित कर " याचा अर्थ,—

(एक) संबद्ध अधिनियमाखाली वेगळा गोळा केलेला कर; किंवा

(दोन) संबद्ध अधिनियमाखाली प्राधिका-याने वैधानिक आदेशामध्ये वेगळा गोळा केलेल्या करासाठी मान्य केलेल्या वजाती ; किंवा

(तीन) संबद्ध अधिनियमाखाली विवरणामध्ये किंवा सुधारित विवरणामध्ये दर्शविलेला देय कर ; किंवा

(चार) मूल्यवर्धित कर नियमाच्या नियम ५७ अन्वये किंवा संबद्ध अधिनियमाखाली करण्यात आलेल्या तत्सम नियमांन्वये वजात म्हणून व्यापा-याने दावा केलेली किंवा पदनिर्देशित अधिका-याने मान्य केलेली अशी वजातीची रक्कम ; किंवा

(पाच) संबद्ध अधिनियमाखाली वैधानिक आदेशान्वये जप्त केलेली किंवा सादर केलेल्या विवरणात, सुधारित विवरणात किंवा, यथास्थिति, लेखापरीक्षा अहवालात गोळा केलेल्या कराची अतिरिक्त दर्शविलेली रक्कम ; किंवा

(सहा) मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ६१ नुसार सादर केलेल्या अहवालात, लेखापरीक्षकाने निर्धारित व देय असल्याचे शिफारस केलेली आणि करपात्र व्यक्तीने एकतर पूर्णतः किंवा अंशतः मान्य केलेली कराची कोणतीही रक्कम; किंवा

(सात) संबद्ध अधिनियमाखाली मालकाने मूळ स्रोतातून वजा केलेला कर (टीडीएस); किंवा

(आठ) मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ३१क अन्वये गोळा केलेला कर,

असा आहे ;

(द) " मूल्यवर्धित कर अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२, असा आहे ; २००५ चा महा. ९.

(ध) " मूल्यवर्धित कर नियम " याचा अर्थ, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमाखाली केलेले महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५, असा आहे.

(२) या अधिनियमात वापरलेले, परंतु, यात व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, संबद्ध अधिनियमान्वये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील.

पदनिर्देशित प्राधिकारी.

**३.** (१) राज्यकर आयुक्त हा, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, आयुक्त असेल.

(२) मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम १० च्या पोट-कलम (२) मध्ये किंवा, यथास्थिति, वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ३ अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेले अधिकारी हे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ पदनिर्देशित प्राधिकारी असतील. उक्त अधिका-याची दुय्यमता ही, मूल्यवर्धित कर नियमाच्या नियम ५ अनुसार असेल.

(३) आयुक्तास, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या पदनिर्देशित प्राधिका-यांकडे त्याचे अधिकार सोपवता येतील आणि असे प्राधिकारी, वेळोवेळी, मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम १० अन्वये किंवा, यथास्थिति, वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (२) व कलम ५ अन्वये अधिसूचित करण्यात येईल अशा त्यांच्या अधिकार क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये अधिकारांचा वापर करतील.

**४.** या अधिनियमाखाली अर्ज सादर करण्याचा व आवश्यक रक्कम भरण्याचा कालावधी हा, खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे असेल :— अधिनियमाखालील टप्प्याचा कालावधी.

**तक्ता**

| अनु. क्र. (क) | तपशील (ख) | पहिला टप्पा (ग) | दुसरा टप्पा (घ) |
|---|---|---|---|
| (१) | आवश्यक रकमेचा भरणा करणे. | १ एप्रिल २०१९ रोजी किंवा त्यानंतर सुरू होणारा आणि ३१ जुलै २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी संपणारा. | १ ऑगस्ट २०१९ रोजी किंवा त्यानंतर सुरू होणारा आणि ३१ ऑगस्ट २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी संपणारा. |
| (२) | अर्ज सादर करण्याचा कालावधी. | १ एप्रिल २०१९ रोजी किंवा त्यानंतर सुरू होणारा आणि ३१ जुलै २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी संपणारा. | १ ऑगस्ट २०१९ रोजी किंवा त्यानंतर सुरू होणारा आणि ३१ ऑगस्ट २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी संपणारा. |

**५.** (१) संबद्ध अधिनियमांमध्ये किंवा या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,— संबद्ध अधिनियमाखाली प्रदान केलेल्या रकमेचे समायोजन आणि कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क, कोणतेही असल्यास, याबद्दलच्या थकबाकीची तडजोड.

(क) वैधानिक आदेशाच्या संबंधात एकतर अपिलात किंवा अन्यथा ३१ मार्च २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी, प्रदान केलेली कोणतीही रक्कम ही, अविवादित कर व विवादित कर यांच्या गुणोत्तराच्या प्रमाणात प्रथमतः करासाठी समायोजित करण्यात येईल आणि त्यांनतर व्याजाची रक्कम म्हणून समायोजित करण्यात येईल आणि समायोजित न झालेली उर्वरित शिल्लक रक्कम नंतर क्रमशः शास्तीपोटी आणि विलंब शुल्कापोटी समायोजित करण्यात येईल ;

(ख) खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे रक्कम समायोजित केल्यानंतर, १ एप्रिल २०१९ रोजी असलेली उर्वरित शिल्लक रक्कम, कोणतीही असल्यास, तीच फक्त तडजोडीसाठी विचारात घेण्यात येईल आणि उपरोक्त शिल्लक रकमेच्या तडजोडीसाठी आणि त्याबद्दलच्या माफीसाठी देय असलेली आवश्यक रक्कम ही, जोडपत्र-क किंवा जोडपत्र-ख अनुसार निर्धारित करण्यात येईल :

परंतु, पदनिर्देशित प्राधिकारी, खंड (क) प्रमाणे करावयाच्या समायोजनाचे गुणोत्तर निश्चित करील.

(२) पूर्ववर्ती खंडाच्या तरतुदी ह्या, विवरणानुसार असलेल्या देणींना किंवा यथास्थिति, लेखापरीक्षकाने लेखापरीक्षा अहवालात केलेल्या शिफारशींनुसार देय असलेल्या कर, व्याज किंवा विलंब शुल्क याबाबतच्या देणींना योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

(३) १६ ऑगस्ट २०१९ नंतर वैधानिक आदेश दिलेले असल्यास अथवा विवरणे किंवा सुधारित विवरणे दाखल केलेली असल्यास, त्याबाबतीत कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क, कोणतीही असल्यास, यांबद्दलच्या कोणत्याही थकबाकीसाठीच्या रकमेची या अधिनियमान्वये तडजोड करण्यात येणार नाही.

**६.** (१) या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, अर्जदार-मग तो संबद्ध अधिनियमान्वये नोंदणीकृत असो किंवा नसो, विनिर्दिष्ट कालावधीच्या संबंधातील कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांबद्दलच्या थकबाकीच्या रकमेची- मग अशी थकबाकीची रक्कम संबद्ध अधिनियमाखालील अपिलात विवादीत असो किंवा नसो, तडजोड करण्यासाठी अर्ज करण्यास पात्र असेल. तडजोडीसाठी पात्रता.

(२) ज्या अर्जदाराने, शासनाकडून कोणत्याही शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या कोणत्याही सर्वसाधारण माफी योजनेखालील किंवा महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड अधिनियम, २०१६ खालील लाभ घेतले असतील असा अर्जदार देखील या अधिनियमान्वये अर्ज करण्यास पात्र असेल. (२०१६ चा महा. १६.)

(३) या अधिनियमाखालील तडजोडीसाठी, कलम ७ मध्ये नमूद केलेल्या शर्तींचे आणि या अधिनियमाच्या इतर तरतुदींचे अनुपालन करण्यात येईल.

**७.** (१) अर्जदार, जोडपत्र-क किंवा जोडपत्र-ख मध्ये नमूद केलेल्या टप्प्यांच्या कालावधीसाठी तरतूद केलेल्या शेवटच्या दिनांकारोजी किंवा त्यापूर्वी, संबद्ध अधिनियमाखालील कलम २ च्या पोट-कलम (१) मधील खंड (ग) मध्ये दिलेल्या थकबाकीच्या प्रत्येक वर्गासाठी एक स्वतंत्र अर्ज करील. थकबाकीच्या रकमेची तडजोड करण्यासाठी शर्ती.

(२) असा अर्ज, आयुक्ताकडून आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने, पदनिर्देशित प्राधिका-याकडे करण्यात येईल.

(३) या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीन राहून, ज्या अर्जदाराची, विनिर्दिष्ट कालावधीसंबंधातील, संबद्ध अधिनियमाखालील विवरणानुसार किंवा सुधारित विवरणानुसार देणींसंबंधातील थकबाकीच्या रकमेची तडजोड करण्याची इच्छा असेल अशा प्रत्येक संबद्ध अधिनियमाखालील अशा प्रत्येक विवरणासाठी एक स्वतंत्र अर्ज सादर करील :

परंतु, ज्या अर्जदाराची एखाद्या वित्तीय वर्षासंबंधीच्या एकापेक्षा अधिक विवरणांच्या किंवा सुधारित विवरणांच्या संबंधातील विवरणानुसार देणींची तडजोड करण्याची इच्छा असेल त्याबाबतीत, अशा अर्जदारास केवळ एकच अर्ज करता येईल :

परंतु आणखी असे की, जर विवरणाची सुधारणा या अधिनियमाच्या प्रारंभानंतर करण्यात आली असेल आणि अशा सुधारणेच्या परिणामी, सुधारित विवरणात दर्शविलेली कराची किंवा व्याजाची किंवा दोन्हींची रक्कम वजावट समायोजनासह इतर कारणाने कमी होत असेल तर, त्याबाबतीत अशा सुधारित विवरणासंबंधातील कोणताही अर्ज विचारात घेतला जाणार नाही :

परंतु तसेच, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, मूळ विवरण व असे सुधारित विवरण दाखल करण्याच्या कालावधीदरम्यान कराचे किंवा व्याजाचे किंवा दोन्हींचे कोणतेही प्रदान रोखीने केल्यामुळे अशा कराची किंवा, यथास्थिती, व्याजाची किंवा दोन्हींची रक्कम कमी झाली असेल त्याबाबतीत, दुस-या परंतुकामधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(४) अशा प्रत्येक अर्जासोबत, कलम १० अन्वये निर्धारित केलेल्या, आवश्यक रक्कम प्रदान केल्याचा पुरावा आणि अर्जाच्या नमुन्यात नमूद केलेली कागदपत्रे सादर करण्यात येतील.

(५) न्यायाधिकरणासहित कोणत्याही अपील प्राधिका-याने किंवा न्यायालयाने ते प्रकरण, त्यात दिलेल्या निदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी, संबद्ध अधिनियमाखालील कोणत्याही प्राधिकरणाकडे परत पाठविले असेल आणि त्याबद्दलचा आदेश १६ ऑगस्ट २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी पारित झालेला नसेल त्याबाबतीत, असे प्रकरण या अधिनियमाखालील तडजोडीस पात्र असणार नाही :

परंतु, अर्जदार, उक्त प्राधिका-याने किंवा न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांबद्दलच्या रकमेची तडजोड करण्यास पात्र ठरेल आणि जर त्यांनी असे विनिर्दिष्ट निदेश दिलेले नसतील तर, तेव्हा असा कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क अशा अर्जदाराकडून निर्धारित करण्यात येईल.

(६) कोणत्याही परिस्थितीत, अर्जदार अविवादीत कराच्या बाबतीत कोणतीही माफी मिळण्यास हक्कदार असणार नाही.

(७) या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीन राहून, अर्जदार, कलम १० नुसार निर्धारित केलेल्या मर्यादेपर्यंत विवादीत कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांबद्दलची माफी मिळण्यास हक्कदार असेल.

(८) वस्तू व सेवा कर अधिनियमाखाली तरतूद केलेल्या इलेक्ट्रॉनिक जमा खातेवहीमध्ये, संबद्ध अधिनियमाखालील वजावट घेतलेल्या ज्या अर्जदाराने जेवढ्या रकमेकरिता तडजोड अर्ज दाखल केला असेल तेवढ्या रकमेएवढी रक्कम, तडजोडीसाठी अर्ज सादर करण्याच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, इलेक्ट्रॉनिक जमाखातेवहीत किंवा इलेक्ट्रॉनिक रोकड वहीत परत जमा केल्याशिवाय अशा अर्जदारासंबंधातील या अधिनियमाखालील कोणताही अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

(९) अर्जदार कलम ८ च्या तरतुदींचे अनुपालन करील.

अपील मागे घेणे.

**८.** (१) (क) संबद्ध अधिनियमाच्या तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अपील प्राधिका-यासमोर किंवा न्यायाधिकरणासमोर किंवा न्यायालयासमोर प्रलंबित असलेले अपील मागे घेण्यासाठी उपरोक्त प्राधिका-यांकडे किंवा न्यायालयाकडे ज्या दिनांकास अपिल मागे घेण्यासाठी अर्ज सादर केला असेल त्या दिनांकास अर्जदाराकडून ते विनाशर्त मागे घेण्यात येईल;

(ख) पदनिर्देशित प्राधिका-याकडे तडजोडीच्या अर्जासोबत अशा अर्जाची पोचपावती सादर करणे हा, उक्त अपील मागे घेतल्याबाबतचा पुरेसा पुरावा असल्याचे समजण्यात येईल.

(२) अर्जदाराची काही विशिष्ट मुद्यांच्या बाबतीत अपील मागे घेण्याची इच्छा असेल आणि काही विशिष्ट मुद्यांकरिता ते अपील पुढे चालविण्याची इच्छा असेल तेव्हा, अर्जदार ते अपील मागे घेण्याबाबत दाखल केलेल्या अर्जात त्याबाबतचा तपशील विनिर्देशपूर्वक नमूद करील, आणि त्याबाबतीत पोट-कलम (१) च्या तरतुदी ह्या, जेथवर अपील मागे घेण्याच्या व त्याबद्दलचा पुरावा सादर करण्याच्या बाबींशी संबंधित असतील तेथवर लागू असतील.

(३) अर्जदाराने उपरोक्त पोट-कलम (२) नुसार अपील मागे घेतल्यास अशा प्रकरणी कलम ५ च्या तरतुदी लागू होतील.

मुद्दे ठरतील असे व्यवहार अधिसूचित करण्याचा आयुक्ताचा अधिकार.

**९.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, आयुक्तास, वेळोवेळी **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, जे व्यवहार मुद्दे ठरतील असे सर्व व्यवहार अधिसूचित करता येतील.

(२) आयुक्ताचा निर्णय मुद्दा ठरणा-या कोणत्याही व्यवहारांच्या वर्गीकरणाशी किंवा अन्यथा संबंधित असेल तेथवर तो अंतिम असेल आणि अशा निर्णयाविरुद्ध कोणत्याही अपील प्राधिका-यासमोर किंवा न्यायालयासमोर कोणतेही अपील दाखल करून घेतले जाणार नाही.

आवश्यक रकमेचे निर्धारण व माफीची मर्यादा.

**१०.** (१) संबद्ध अधिनियमाखालील कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांबद्दलची थकबाकी,—

(क) ३१ मार्च २०१० रोजी किंवा त्यापूर्वी संपणा-या कालावधीशी संबंधित असेल आणि उक्त कर हा अविवादित किंवा विवादित असेल तेव्हा, असा अविवादित कर, विवादित कर, व्याज किंवा विलंब शुल्क यांबद्दलच्या प्रदानाची मर्यादा आणि कलम ४ मध्ये दिल्याप्रमाणे, पहिल्या टप्प्याकरिता किंवा, यथास्थिति, दुस-या टप्प्याकरिता विवादित कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यासंबंधात लागू असलेली माफी, जोडपत्र-क मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल ;

(ख) १ एप्रिल २०१० रोजी किंवा त्यानंतर सुरू होणा-या आणि ३० जून २०१७ रोजी किंवा त्यापूर्वी संपणा-या कालावधीशी संबंधित असेल आणि असा कर अविवादित किंवा विवादित असेल तेव्हा, असा अविवादित कर, विवादित कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांबद्दलच्या प्रदानाची मर्यादा आणि कलम ४ मध्ये दिल्याप्रमाणे, पहिल्या टप्प्याकरिता किंवा, यथास्थिति, दुस-या टप्प्याकरिता विवादित कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांसंबंधात लागू असलेली माफी, जोडपत्र -ख मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.

(२) अर्जदार, प्रवेशावरील कर अधिनियमांन्वये प्रवेश कर भरण्यास पात्र असेल तेव्हा, या अधिनियमाखालील तडजोडीच्या प्रयोजनासाठी या अधिनियमात किंवा संबद्ध अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) आवश्यक रक्कम ही,—

(एक) वैधानिक आदेशाद्वारे निश्चित केलेली, किंवा

(दोन) असा वैधानिक आदेश पारित झाला नसेल तेव्हा, प्रवेशकरावरील अधिनियमान्वये देय प्रवेश कर, किंवा

मूल्यवर्धित कर नियमाच्या नियम अनुक्रमे ५३ किंवा ५४ अन्वये किंवा मुंबई विक्रीकर नियम, १९५९ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे वजावटीद्वारे कमी केलेल्या किंवा वजावट नाकारलेल्या रकमेएव्हढी रक्कम, यापैकी जी कमी असेल ती रक्कम ;

(ख) उक्त अर्जदाराने खंड (क) अन्वये निर्धारित केल्याप्रमाणे रक्कम ही कलम ४ मध्ये नमुद टप्प्यांचा विचार करून व तडजोडीसाठीच्या ईच्छित कालावधीसाठीच्या शेवटच्या दिनांकारोजी किंवा त्यापूर्वी भरली असेल तर, देय असलेली उर्वरित कराची बाकी रक्कम, या अधिनियमाखाली आदेश काढून त्याद्वारे माफ करण्यात येईल आणि उक्त अर्जदार मूल्यवर्धित कर किंवा यथास्थिति, मुंबई विक्रीकर नियम, १९५९ नियमांखालील कोणत्याही रकमेचा ३१ मार्च २०१९ रोजी किंवा त्यापूर्वी भरणा केलेल्या रकमेसह वजावटीचा दावा करण्यास हक्कदार असणार नाही :

परंतु, ३१ मार्च २०१९ रोजी किंवा त्यापुर्वी कोणत्याही कारणास्तव केलेला भरणा हा आवश्यक रक्कम समजण्यात येणार नाही ;

(ग) कोणत्याही वैधानिक आदेशानुसार असलेले व्याज आणि असा कोणताही आदेश काढण्यात आला नसेल तर प्रवेशावरील कर अधिनियमाखाली देय असलेल्या कराच्या रकमेच्या आधारे परिगणित केलेले असे व्याज, ज्या टप्प्याच्या कालावधीतील थकबाकीच्या तडजोडीसाठी अर्ज सादर केला असेल त्या टप्प्यावर अवलंबून राहून जोडपत्र-क किंवा, यथास्थिति, जोडपत्र-ख अनुसार आवश्यक रक्कम आणि त्यासंबंधीची माफी निर्धारित करण्यासाठी विचारात घेण्यात येईल आणि अशा निर्धारित केलेल्या आवश्यक रकमेचे प्रदान करण्यात येईल ;

(घ) कोणत्याही वैधानिक आदेशाप्रमाणे लादलेल्या शास्तीच्या संबंधातील आवश्यक रक्कम व माफी ज्या टप्प्याच्या कालावधीतील थकबाकीच्या तडजोडीसाठी अर्ज सादर केला असेल त्या टप्प्यावर अवलंबून राहून जोडपत्र-क किंवा, यथास्थिति, जोडपत्र-ख अनुसार निर्धारित करण्यात येईल आणि अशा निर्धारित केलेल्या आवश्यक रकमेचे प्रदान करण्यात येईल.

(३) या कलमान्वये निर्धारित केलेल्या आवश्यक रकमेचे प्रदान, संबद्ध अधिनियमांन्वये विहित केलेल्या चलनाच्या स्वरूपात किंवा, यथास्थिति, मूल्यवर्धित नियमांन्वये विहित केलेल्या नमुना एमटीआर-६ मध्ये करण्यात येईल आणि ते, पहिल्या टप्प्यास किंवा दुस-या टप्प्यास लागू असल्याप्रमाणे, कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी करण्यात येईल.

(४) अर्जदाराने केलेले प्रदान हे या कलमान्वये किंवा कलम ११ अन्वये निर्धारित केलेल्या आवश्यक रकमेपेक्षा कमी रकमेचे असेल तेव्हा, पदनिर्देशित प्राधिकारी, अर्जदाराने भरलेल्या आवश्यक रकमेच्या प्रमाणात, पहिल्या टप्प्याखाली किंवा, यथास्थिति, दुस-या टप्प्याखाली अनुज्ञेय असलेल्या माफीच्या रकमेची संगणना करील आणि त्यानुसार तडजोडीचा आदेश काढील :

परंतु, अर्जदाराने या कलमान्वये किंवा कलम ११ अन्वये निश्‍चित केलेल्या आवश्यक रकमेपेक्षा कमी रकमेचा भरणा केला असल्यास, अशी भरणा केलेली रक्कम प्रथमतः अविवादित करासाठी समायोजित होईल आणि अशा समायोजनानंतर काही रक्कम शिल्लक असल्यास ती विवादित कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्यासाठी प्रमाणशीर समायोजित होईल.

(५) अधिनियमाखालील पहिल्या टप्प्याच्या किंवा दुस-या टप्प्याच्या कालावधीसंबंधी अर्जदाराने केलेले प्रदान हे आवश्यक रकमेपेक्षा कमी आहे केवळ एवढ्याच कारणावरून कोणताही अर्ज नाकारण्यात येणार नाही.

अर्जाची अचूकतेची आणि परिपूर्णतेची पडताळणी करणे आणि आवश्यकता भासल्यास, उणीव नोटीस काढणे.

**११.** (१) पदनिर्देशित प्राधिकारी अर्जात सादर केलेल्या तपशिलांच्या आणि अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या निर्धारण प्राधिका-याकडे किंवा, यथास्थिति, ज्याच्याकडे असे अभिलेख उपलब्ध आहेत अशा इतर कोणत्याही प्राधिका-याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखाच्या संदर्भात अचूकतेबाबत पडताळणी करील. पदनिर्देशित प्राधिकारी, अर्जाच्या नमुन्यात नमूद केलेली कागदपत्रे त्या अर्जासोबत जोडले असल्याची पडताळणी करून सुनिश्‍चिती करील.

(२) अर्जाची पडताळणी केल्यावर, उक्त अर्ज चुकीचा किंवा अपूर्ण असल्याचे किंवा प्रदान केलेली आवश्यक रक्कम पुरेशी नसल्याचे निदर्शनास आले असेल तेव्हा त्या प्रकरणी, पदनिर्देशित प्राधिकारी, शक्यतोवर, तो अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, उणीव नोटीस देईल आणि प्रदान करावयाच्या आवश्यक रकमांच्या तपशिलासह त्या अर्जातील उणिवांविषयी अर्जदाराला कळवील :

परंतु, एखाद्या अर्जाच्या संबंधातील उणीव नोटीस ही, फक्त एकदाच देता येईल.

(३) अर्जदार उणीव नोटीस मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत , त्या उणिवा दुरुस्त करील आणि रक्कम, कोणतीही असल्यास, प्रदान करील आणि असा अर्ज पदनिर्देशित प्राधिका-याला सादर करील :

परंतु, कोणत्याही परिस्थितीत, त्या अर्जदाराला ३१ ऑगस्ट २०१९ नंतर उणीव नोटीशीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रदान करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

(४) पदनिर्देशित प्राधिकारी असा अर्ज मिळाल्यावर, त्या अर्जाच्या अचूकतेची आणि परिपूर्णतेची पडताळणी करील आणि ज्या टप्प्यामध्ये आवश्यक रकमेचे प्रदान केले असेल तो टप्पा विचारात घेऊन आवश्यक रकमेची आणि माफीच्या मर्यादेची संगणना करील.

(५) अर्जदाराने ते अतिरिक्त प्रदान, कोणतेही असल्यास, त्यासह अशा प्रकारे कळविण्यात आलेल्या उणिवा दुरुस्त करण्यात कसूर केली असेल तेव्हा, पदनिर्देशित प्राधिका-यास, कारणे लेखी नमूद करून आणि अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, समुचित आदेश पारित करेल :

परंतु, पदनिर्देशित प्राधिकारी, अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, ज्या टप्प्याबाबत आवश्यक रक्कम भरली असेल तो टप्पा विचारात घेऊन उक्त अर्जदाराला उपलब्ध असतील असे प्रमाणशीर लाभ नाकारणार नाही.

**१२.** (१) अर्जदाराने कलम १० अनुसार निर्धारित करण्यात आलेली आवश्यक रक्कम भरली असल्याबाबत पदनिर्देशित प्राधिका-याची खात्री पटल्यास, त्याबाबतीत पदनिर्देशित प्राधिकारी, एक आदेश देईल आणि उक्त आदेशाची एक प्रत अर्जदाराला देईल आणि त्यानंतर, संबद्ध अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा अर्जदाराला तडजोडीच्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या माफीच्या रकमेच्या मर्यादेपर्यंत त्याच्या दायित्वातून मुक्त करण्यात येईल. थकबाकीची तडजोड व तडजोडीचा आदेश पारित करणे.

(२) कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीच्या तडजोडीबद्दलचा अर्ज, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नसेल तेव्हा, त्याबाबतीत पदनिर्देशित प्राधिका-यास, त्या अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर लेखी आदेशाद्वारे, तो अर्ज फेटाळता येईल.

(३) पदनिर्देशित प्राधिका-यास, स्वतःहून किंवा त्या अर्जदाराच्या अर्जावरून, त्या अर्जदाराला तडजोड आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, त्या अभिलेखातील कोणतीही संभाव्य चूक दुरुस्त करता येईल :

परंतु, अर्जदाराला, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, त्याच्यावर प्रतिकूल परिणाम करणारा कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

**१३.** (१) कलम १२ अन्वये देण्यात आलेल्या आदेशावरील अपील हे,— अपिले.

(क) जर तो आदेश दुय्यम असलेल्या प्राधिका-याने दिलेला असेल तर, विक्रीकर उप आयुक्ताकडे दाखल करण्यात येईल ;

(ख) जर तो आदेश संबंधित विक्रीकर उप आयुक्ताने दिलेला असेल तर, संबंधित विक्रीकर सह आयुक्ताकडे दाखल करण्यात येईल.

(२) कलम १२ मधील नमूद आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत अपील दाखल करण्यात येईल आणि त्यानंतर दाखल करण्यात आलेले कोणतेही अपील, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या प्राधिका-यांनी त्याबाबतचा विलंब क्षमापित केल्याशिवाय विचारात घेण्यात येणार नाही.

**१४.** (१) न्यायाधिकरणासहित कोणताही अपील प्राधिकारी कलम ७ अन्वये अर्जदाराने ज्याकरिता अर्ज केला असेल त्या एक किंवा अधिक मुद्यांच्या किंवा सर्व मुद्यांच्या संबंधात आणि त्यांच्या मर्यादेपर्यंत, विनिर्दिष्ट कालावधीसंबंधीच्या, संबद्ध अधिनियमाखालील कोणत्याही अपीलावर निर्णय करण्याची कार्यवाही करणार नाही. प्राधिका-यांचे अधिकार.

(२) संबद्ध अधिनियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निर्धारण प्राधिकारी, न्यायाधिकरणासहित अपील प्राधिकारी, पुनरीक्षण प्राधिकारी, पुनर्विलोकन प्राधिकारी,—

(क) ज्यांबद्दल अर्जदाराने तडजोड अर्ज केलेला नसेल अशा मुद्यांच्या मर्यादेपर्यंत ; किंवा

(ख) कलम १३ खाली कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल त्याबाबतीत पदनिर्देशित प्राधिका-याकडून तडजोडीचा अर्ज फेटाळणारा, कलम १२ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत,

संबद्ध अधिनियमानुसार असे निर्धारण, अपील, पुनरीक्षण किंवा पुनर्विलोकन यांबाबतचा निर्णय करण्याची कार्यवाही करील.

**१५.** कलम १२ च्या पोट-कलम (१) खाली दिलेला तडजोड आदेश हा, त्यात अंतर्भूत असलेल्या थकबाकीच्या तडजोडीबाबत निर्णायक असेल, आणि अशा आदेशात अंतर्भूत असलेली कोणतीही बाब, संबद्ध अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत किंवा पुनर्विलोकनात किंवा पुनरीक्षणात किंवा इतर कोणत्याही कार्यवाहीत पुन्हा उघडण्यात येणार नाही. तडजोड केलेली प्रकरणे पुन्हा उघडण्यावर रोध असणे.

तडजोडीचा आदेश रद्द करणे.

**१६.** (१) कलम १५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पदनिर्देशित प्राधिका-यास, अर्जदाराने कोणतीही महत्त्वाची माहिती दडवून ठेऊन किंवा कोणतीही चुकीची किंवा खोटी माहिती सादर करून तडजोडीचा लाभ मिळविला असल्याचे दिसून आल्यास किंवा संबद्ध अधिनियमान्वये तपास व जप्ती यासंबंधातील कोणत्याही कार्यवाहीतील महत्त्वाचे तथ्य दडवून ठेवले असल्याचे आढळून येईल तेंव्हा, पदनिर्देशित प्राधिका-यास, अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आणि कारणे लेखी नमूद करून, ज्या वित्तीय वर्षात तडजोडीचा आदेश बजावण्यात आला असेल त्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत, कलम १२ च्या पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला उक्त आदेश रद्द करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये तडजोडीचा आदेश रद्द करण्यात आल्यास, अशा तडजोडीच्या आदेशात समाविष्ट असलेले निर्धारण, पुनरीक्षण, पुनर्विलोकन किंवा, यथास्थिति, अपील, कलमे ८ आणि १५ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, तडजोडीचा आदेश अशा प्रकारे रद्द करण्यात आल्यावर, ताबडतोब पुनरूज्जीवित व पुनःस्थापित होतील, आणि असे निर्धारण, पुनरीक्षण, पुनर्विलोकन किंवा, यथास्थिति, अपील यावर, जणूकाही कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क याबद्दलच्या थकबाकीच्या तडजोडीचा असा कोणताही आदेश कधीही देण्यात आला नव्हता असे समजून, संबद्ध अधिनियमाच्या तरतुदींनुसार निर्णय करण्यात येईल, आणि संबद्ध अधिनियमान्वये मुदतमर्यादेची तरतूद करण्यात आली असली तरी, असा रद्दबातल आदेश काढल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत संबंधित प्राधिका-यांकडून असे निर्धारण, पुनरीक्षण, पुनर्विलोकन किंवा यथास्थिति, अपील याबाबत कार्यवाही करण्यात येईलः

परंतु, रद्दबातल आदेश कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत अपील प्राधिका-याकडे याबाबत अर्ज करण्यात आल्यावर अपील पुनःस्थापित करण्यात येईल.

पुनर्विलोकन.

**१७.** पदनिर्देशित प्राधिका-याकडून आदेश काढण्यात आल्यानंतर, आयुक्तास, आदेश बजावल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या आत, कोणत्याही वेळी स्वतःहून अशा आदेशाचा अभिलेख मागविता येईल आणि अशा आदेशामध्ये चूक आढळल्यास, जेथवर महसुलाच्या हितास तो बाधक ठरेल तेथवर, करपात्र व्यक्तीवर नोटीस बजावता येईल आणि आवश्यकता भासेल तेथे आपल्या यथा निर्णयशक्तीनुसार आदेश काढता येईल.

अधिनियमाान्वये कोणताही परतावा न मिळणे.

**१८.** कोणत्याही परिस्थितीत, अर्जदार या अधिनियमान्वये भरणा करण्यात आलेल्या रकमेचा परतावा मिळण्यास हक्कदार असणार नाही :

परंतु, कलम १६ च्या तरतुदीनुसार तडजोडीचा आदेश रद्द करण्यात आल्यास, या अधिनियमाखाली अर्जदाराने भरणा केलेली रक्कम, संबद्ध अधिनियमान्वये भरण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

अधिनियमाखालील आयुक्तांचे अधिकार.

**१९.** (१) आयुक्तास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, पदनिर्देशित प्राधिका-यांना, त्याला योग्य वाटतील असे अनुदेश व निदेश वेळोवेळी देता येतील.

(२) आयुक्तास, आदेशाद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी नमुने, आणि ज्या रीतीने नमुना सादर करण्यात येईल ती रीत विहित करता येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, शासनास, प्रसंगानुरुप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

सन २०१९ चा महा. अध्या. ५.

**२१.** (१) महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अध्यादेश, २०१९ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाच्या संबंधित तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## जोडपत्र-क

### (कलम १० पहावे)

### दिनांक ३१ मार्च २०१० पर्यंतच्या कालावधीकरिता

| अ. क्र. | रक्कम | पहिला टप्पा | | दुसरा टप्पा | |
|---|---|---|---|---|---|
| | | भरावयाची रक्कम | माफीची रक्कम | भरावयाची रक्कम | माफीची रक्कम |
| (क) | (ख) | (ग) | (घ) | (ङ) | (च) |
| (१) | अविवादित कराची रक्कम | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १०० टक्के | निरंक | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १०० टक्के | निरंक. |
| (२) | विवादित कराची रक्कम | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ५० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ५० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ६० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ४० टक्के. |
| (३) | संबद्ध अधिनियमान्वये देय असणारे व्याज किंवा कोणताही वैधानिक आदेश किंवा विवरणे किंवा सुधारित विवरणे यानुसार देय असलेल्या व्याजाची रक्कम. | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ९० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या २० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ८० टक्के. |
| (४) | कोणत्याही वैधानिक आदेशानुसार शास्तीची शिल्लक असणारी रक्कम किंवा संबद्ध अधिनियमान्वये लादण्यात येऊ शकणारी शास्ती. | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ५ टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ९५ टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ९० टक्के. |
| (५) | संबद्ध अधिनियमाखाली व्यापा-याने केलेल्या अर्जाच्या दिनांकापर्यंत आकारण्याजोगे असलेल्या परंतु न आकारलेल्या निर्धारणोत्तर व्याजाची किंवा शास्तीची किंवा दोन्हींची रक्कम. | स्तंभ (ख) मधील रकमेच्या शून्य टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १०० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या शून्य टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १०० टक्के. |
| (६) | दिनांक १ एप्रिल २०१९ ते दिनांक ३१ ऑगस्ट २०१९ पर्यंतच्या कालावधीत दाखल केलेल्या विवरणांबाबत देय असलेले विलंब शुल्क. | स्तंभ (ख) मधील रकमेच्या शून्य टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १०० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या शून्य टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १०० टक्के. |

## जोडपत्र-ख

### (कलम १० पहावे)

### दिनांक १ एप्रिल २०१० पासून सुरू होणा-या व दिनांक ३० जून २०१७ रोजी किंवा त्यापूर्वी संपणा-या कालावधीकरिता

| अ. क्र. | रक्कम | पहिला टप्पा | | दुसरा टप्पा | |
|---|---|---|---|---|---|
| | | भरावयाची रक्कम | माफीची रक्कम | भरावयाची रक्कम | माफीची रक्कम |
| (क) | (ख) | (ग) | (घ) | (ङ) | (च) |
| (१) | अविवादित कराची रक्कम | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १०० टक्के | निरंक | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १०० टक्के | निरंक. |
| (२) | विवादित कराची रक्कम | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ७० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ३० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ८० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या २० टक्के. |
| (३) | संबद्ध अधिनियमान्वये देय असणारे व्याज किंवा कोणताही वैधानिक आदेश किंवा विवरणे किंवा सुधारित विवरणे यानुसार देय असलेल्या व्याजाची रक्कम. | स्तंभ (ख) मधील रकमेच्या २० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ८० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ३० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ७० टक्के. |
| (४) | कोणत्याही वैधानिक आदेशानुसार शास्तीची शिल्लक असणारी रक्कम किंवा संबद्ध अधिनियमान्वये लादण्यात येऊ शकणारी शास्ती. | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ९० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या २० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या ८० टक्के. |
| (५) | संबद्ध अधिनियमाखाली व्यापा-याने केलेल्या अर्जाच्या दिनांकापर्यंत आकारण्याजोगे परंतु न आकारलेल्या निर्धारणोत्तर व्याजाची किंवा शास्तीची किंवा दोन्हींची रक्कम. | स्तंभ (ख) मधील रकमेच्या शून्य (०) टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १०० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या शून्य (०) टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १०० टक्के. |
| (६) | दिनांक १ एप्रिल २०१९ ते दिनांक ३१ ऑगस्ट २०१९ पर्यंतच्या कालावधीत दाखल केलेल्या विवरणांबाबत देय असलेले विलंब शुल्क. | स्तंभ (ख) मधील रकमेच्या शून्य टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १०० टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या शून्य टक्के | स्तंभ (ख) मधील रकमेच्या १०० टक्के. |

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.